



आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.HVTO/
दि.

जाहीर निवेदन

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये अथवा हद्दीबाहेर स्वता:च्या अथवा भाड्याच्या जागेवर भटके श्वान ठेवण्यासाठी (१०० श्वान ठेवण्यासाठी) शेल्टर उभारून सदर ठिकाणी मा.सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार श्वान ठेवण्याचे नियोजन असून ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मान्यताप्राप्त संस्थाकडून, खाजगी अथवा भाड्याच्या जागे मध्ये (७० फुट X ४० फुट जागेमध्ये) इन्फ्रास्ट्रक्चर उभारून भटक्या व मोकाट श्वान शेल्टरमध्ये ०५ वर्ष कालावधीसाठी खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

- प्रस्तावित अटी व शर्ती पुढीलप्रमाणे –

अटी व शर्ती

१. पुणे मनपाच्या आवश्यकतेनुसार शेल्टरची संख्या निश्चित करण्यात येईल.
२. एका शेल्टर मध्ये फक्त १०० भटके श्वान ठेवता येतील.
३. भटक्या कुत्र्यांना शेल्टर मध्ये ठेवण्यासाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने File No. AC-02017/22/2025 –AWBI दि.२७/११/२०२५ रोजी निर्देशित केलेल्या **SOP** मधील नियमावलीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.
४. ॲनिमल वेलफेयर बोर्ड ऑफ इंडियाचे सदर संस्थेकडे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
५. ॲनिमल वेलफेयर बोर्ड ऑफ इंडियाच्या दि.२७/०५/२०२२ च्या परिपत्रकानुसार सदर संस्थेने नूतनीकरण करण्याबाबतची पूर्तता करणे आवश्यक आहे.
६. भटक्या श्वान शेल्टर मध्ये ठेवल्यानंतर sop मध्ये नमूद केल्या प्रमाणे जेवण देणे बंधनकारक राहील.
७. सदर शेल्टर मुळे नागरिकांना त्रास होऊ न देण्याची जबाबदारी संस्थेची राहील. अथवा सदर शेल्टर जागा नागरी वस्ती पासून लांब असावी.
८. भटके श्वान शेल्टर मध्ये ठेवल्यानंतर त्यांचे रेकार्ड ठेवणे बंधनकारक राहील.
९. शेल्टरची स्वच्छता ठेवणे आवश्यक आहे.
१०. खाद्य पदार्थ शिल्लक राहिल्यानंतर त्याची वेळेत विल्हेवाट लावणे बंधनकारक राहील.
११. शेल्टरचे बांधकाम संस्थेला स्व: खर्चाने करावे लागेल.
१२. शेल्टरच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
१३. शेल्टर मध्ये कर्मचारी नियुक्त करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१४. शेल्टरच्या बांधकामासाठी पुणे महानगरपालिका आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणार नाही.

१५. खाजगी संस्थेकडून उभारण्यात आलेले पिंजरे हे ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या निकषाप्रमाणे अथवा दि.२७/११/२०२५ रोजी निर्देशित केलेल्या SOP प्रमाणे असणे आवश्यक आहे.

१६. निर्माण होणाऱ्या वेस्टीजची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

१७. प्रती कुत्रा प्रती दिवस (र.रु.१०३/- प्रमाणे) देयक अदा करण्यात येईल.

१८. शेल्टर मध्ये ठेवण्यात आलेले कुत्र्यांची देखभाल व CCTV काम करणाऱ्या सर्व संस्थांनी मनपाने प्रमाणित केलेले मोबाईल App वापरणे बंधनकारक राहील. मनपा कडील मोबाईल App उपलब्ध न झाल्यास संस्थेने स्वताचे मोबाईल App वापरावे लागेल.

१९. पात्र ठरणाऱ्या संस्थेना मनपाच्या आवश्यकतेनुसार व नियोजनाप्रमाणे उपलब्ध होतील त्याप्रमाणात भटके कुत्रे शेल्टर मध्ये ठेवण्यासाठी वाटून दिले जाईल.

२०. शेल्टरवर व संस्थेच्या कामावर आरोग्य कार्यालय पशुवैद्यकीय विभागाचे नियंत्रण राहील.

२१. पात्र संस्थेकडे ०१ वाहन असणे आवश्यक आहे.

२२. वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास सदर संस्थेला देण्यात आलेले काम अथवा करण्यात आलेला करारनामा रद्द करण्याचे अथवा काम काढून घेण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना आहेत.

२३. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

तरी उपरोक्त अटी व शर्तीस अधीन राहून काम करणाऱ्या ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मान्यताप्राप्त संस्थांनी आपले योग्य त्या कागदपत्रासह (AWBI प्रमाणपत्र, ३ वर्षाचे फायनान्शियल रिपोर्ट, अनुभव प्रमाणपत्र, जागा मालकीचे कागदपत्र (७/१२ अथवा खरेदी खत प्रत) जागा भाड्याची असल्यास रजिस्टर भाडे करार,(नोटरी करारनामा ग्राह्य धरला जाणार नाही) ग्रामपंचायत ना हरकत दाखला इत्यादी सर्व कागदपत्रे प्रस्ताव आरोग्य अधिकारी यांचे नावे आरोग्य कार्यलय,३ रा मजला या ठिकाणी दि.११/०८/२०२६ दुपारी २.०० वाजेपर्यंत बंद पाकिटात समक्ष सादर करावेत.

डॉ.निना बोराडे
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका